महाराष्ट्राच्या ग्रामीण व शहरी भागातील लोकप्रिय दैनिक

दैनिक ठाणे **जीवनदीप वार्ता**

मुंबई • नवी मुंबई • ठाणे • रायगड • पालघर

मुख्य संपादक : रवींद्र घोडविंदे | Rs.2/- | कार्यकारी संपादिका : डॉ. प्रतिक्षा रवींद्र घोडविंदे (एम.डी.)

बुधवार ■ 05 मार्च 2025 ■ वर्ष 6 ■ अंक 248 ■ RNI NO : MAHMAR/2016/72091 ■ Postal Reg. No. THC/256/2022-2024





## उल्हासनगर पालिका २०० कोटीचे टार्गेट गाठणार ?

### एका आठवड्यात १५ कोटीची वसुली

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**उल्हासनगर** - महापालिकेने मालमत्ता कर विभागासाठी तीन टप्यात लागू केलेल्या अभययोजने अंतर्गत ७ व्या दिवसी १५ कोटी पेक्षा जास्त वसुली झाल्याची माहिती उपायुक्त अजय साबळे यांनी दिली. कर वसुलीसाठी सर्व विभाग प्रमुखांना ऐक तास अभय योजनेचे काम करून, कमीतकमी २० घरांना भेटी देण्याचे आदेश आयुक्तानी काढले आहे. उल्हासनगर महापालिका आयुक्त मनिषा आव्हाळे यांनी नागरिक व राजकीय नेत्यांच्या आग्रहाखातर मालमत्ता कर विभागासाठी अभय योजना तीन टप्प्यात लागू केली. योजनेचा पहिला टप्प्या २४ फेब्रुवारी ते ६ मार्च दरम्यान असून थकबाकीची एकत्रित रकम भरल्यास त्यावरील दंड व व्याज १०० टक्के माफ होणार आहे. तर दुसरा टप्पा ७ ते १२ मार्च असून थकबाकीची एकत्रित रक्कम भरल्यास ७५ टक्के दंड व व्याज माफ होणार आहे. तर तिसरा टप्पा १३ ते १८ मार्च दरम्यान असून ५० टक्के दंड व व्याज माफ होणार आहे.

# धनंजय मुंडेंचा राजीनामा





“ बीड जिल्ह्यातील मस्साजोगचे स्व. संतोष देशमुख यांच्या निर्घृण हत्येतील आरोपींना कठोरात कठोर शिक्षा व्हावी, ही माझी पहिल्या दिवसापासूनची ठाम मागणी आहे. काल समोर आलेले फोटो पाहून तर मन अत्यंत व्यथित झाले. या प्रकरणाचा तपास पूर्ण झाला असून आरोपपत्र न्यायालयात दाखल झाले आहे. तसेच, न्यायालयीन चौकशीही प्रस्तावित आहे. माझ्या सदसद् विवेक बुद्धीला स्मरून आणि मागील काही दिवसांपासून माझी प्रकृती ठीक नसल्याने पुढील काही दिवस उपचार घेण्याचा सल्ला डॉक्टरांनी दिला आहे त्यामुळे वैद्यकीय कारणास्तव सुद्धा मी मंत्रिमंडळातून माझ्या मंत्रिपदाचा राजीनामा मा. मुख्यमंत्री महोदयांकडे दिला आहे.

**-धनंजय मुंडे**

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

बीडमधील मस्साजोगचे सरपंच संतोष देशमुख यांच्या हत्या प्रकरणावरुन धनंजय मुंडे यांना सातत्याने लक्ष केलं जात होतं. वाल्मिक कराडला अटक केल्यानंतर धनंजय मुंडेंचा निकटवर्तीय असल्याने त्यांनी राजीनामा द्यावा अशी मागणी होत होती. भाजपा आमदार सुरेस धस आणि सामाजिक कार्यकर्त्या अंजली दमानिया यांनी तर यावरुन रान पेटवलं होतं. यानंतर आझ अखेर धनंजय मुंडे यांनी राजीनामा दिला. राज्यपालांनीही धनंजय मुंडे यांचा राजीनामा स्विकारला आहे. विश्वसनीय सूत्रांच्या माहितीनुसार, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस हे सुरुवातीपासून धनंजय मुंडे यांच्या राजीनाम्यासाठी आग्रही होते. त्यांनी यासंदर्भात अजित पवारांशी चर्चाही केली होती. पण धनंजय मुंडे राजीनामा देण्यास तयार नव्हते. अखेरीस देवेंद्र फडणवीस यांनी जर तुम्ही राजीनामा देणार नसाल, तर मला राज्यपालांना पत्र लिहून तुम्हाला मंत्रिमंडळातून काढण्याची कारवाई करावी लागेल अशी भूमिका घेतली. देवेंद्र फडणवीस यांच्या या इशाऱ्यानंतर वातावरण बदललं.

दरम्यान रविवारी पुन्हा एकदा धनंजय मुंडे यांना उद्याच्या उद्या राजीनामा द्या, असं मुख्यमंत्र्यांनी सांगितलं आणि आज सकाळी मुंडेंचा राजीनामा मुख्यमंत्र्यांच्या हाती आला. प्रारंभीपासूनच या प्रकरणात मुख्यमंत्र्यांनी अतिशय कडक आणि ठोस भूमिका घेतली होती, अशी सूत्रांची माहिती आहे.

## मुंडेंच्या राजीनाम्याचा घटनाक्रम

- मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस हे प्रारंभीपासून धनंजय मुंडे यांनी राजीनामा द्यावा, यासाठी आग्रही होते. यापूर्वी 3 ते 4 वेळा अजितदादांशी त्यांनी चर्चा केली होती.
- स्वत: धनंजय मुंडे यांनाही समजावून सांगितले होते. पण, धनंजय मुंडे ऐकायला तयार नव्हते.
- शेवटी एका क्षणी देवेंद्र फडणवीस यांनी अशी भूमिका घेतली की, जर तुम्ही राजीनामा देणार नसाल, तर मला राज्यपालांना पत्र लिहून तुम्हाला मंत्रिमंडळातून काढण्याची कारवाई करावी लागेल. या इशाऱ्यानंतर वातावरण बदलले.
- काल पुन्हा धनंजय मुंडे यांना उद्याच्या उद्या राजीनामा द्या, असे मुख्यमंत्र्यांनी त्यांना सांगितले आणि आज सकाळी मुंडेंचा राजीनामा मुख्यमंत्र्यांच्या हाती आला. प्रारंभीपासूनच या प्रकरणात मुख्यमंत्र्यांनी अतिशय कडक आणि ठोस भूमिका घेतली होती, अशी सूत्रांची माहिती आहे.
- म्हणूनच एकदा धनंजय मुंडेंच्या राजीनाम्यावर अजित पवारांनी भूमिका स्पष्ट करावी, असे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस हे माध्यमांशी बोलताना म्हणाले होते.

## राजीनामा कोणाच्या पथ्यावर

**मुंबई** : धनंजय मुंडे यांच्यावर राजीनाम्यासाठी दबाव असल्याचे सुरुवातीपासूनच सागितले जातंय. हेच नाही तर संतोष देशमुख यांच्या हत्येदरम्यानचे फोटो व्हायरल झाल्यानंतर देवेंद्र फडणवीस अजित पवारांच्या भेटीसाठी देवगिरीवर पोहोचले. यावेळी त्यांच्यात बैठक झाली आणि या बैठकीला सुनील तटकरे आणि धनंजय मुंडे हे देखील उपस्थित होते. मुख्यमंत्र्यांनी धनंजय मुंडे यांचा राजीनामा मागितल्याचे सागितले जातंय. मिळालेल्या माहितीनुसार, आज धनंजय मुंडे हे अगदी काही वेळातच मुख्यमंत्र्यांकडे आपल्या मंत्रिपदाचा राजीनामा पाठवतील. धनंजय मुंडे यांनी राजीनामा दिल्यानंतर अन्न नागरी पुरवठा आणि ग्राहक संरक्षण हे मंत्रिपद नेमके कोणाकडे जाईल, यावर जोरदार चर्चा ही रंगताना दिसतंय. हे मंत्रिपद अजित पवार यांच्या खात्यातील असल्याने नवीन होणारा मंत्री देखील अजित पवार गटाचाच असेल हे तर अगदी स्पष्ट आहे. यासाठी काही नावे देखील चर्चेत आहेत. मंत्रिमंडळ सविस्तरानंतर आमदार छगन भुजबळ हे नाराज होते. त्यांनी आपली नाराजी जाहिरपणे बोलून देखील दाखवली. राजकीय घडामोडींना वेग, देवेंद्र फडणवीस, अजित पवार, सुनील तटकरे यांच्यात बैठक, धनंजय मुंडे यांच्या राजीनाम्यानंतर हे मंत्रिपद छगन भुजबळ यांना दिले जाईल आणि त्यांचे राजकिय पुर्नवसन केले जाईल, अशी एक चर्चा आहे. धनंजय मुंडे यांना मंत्रिपद मिळाल्यानंतर छगन भुजबळ यांच्या भेटीला धनंजय मुंडे हे गेले होते. प्रकाश सालुंखे यांचे नाव देखील चर्चेत असल्याचे बघायला मिळतंय. मंत्रिपदाची माळ ही त्यांच्या गळ्यात पडण्याची दाट शक्यता वर्तवली जातंय. शेवटी अजित पवार याबद्दल निर्णय घेतील. आपण जरांगेंच्या विरोधात लढलो आणि त्याचे गिफ्ट आपल्याला मिळाल्याचे भुजबळांनी त्यावेळी म्हटले होते.

# भिवंडीतील खासगी रुग्णालये आरोग्य संचालकांच्या रडारवर

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**भिवंडी, ता. ४** : राज्याच्या आरोग्यसेवा विभागाच्या संचालकांनी राज्यातील सर्व नोंदणीकृत खासगी रुग्णालयांत महाराष्ट्र शुश्रूषा नोंदणी अधिनियम १९४९ मधील तरतुदींच्या पालनाबाबत शहानिशा करण्याचे निर्देश दिले आहेत. त्यानुसार भिवंडी महापालिकेच्या वैद्यकीय विभागाने शहरातील एका खासगी रुग्णालयावर कारवाई केली आहे. त्यामुळे खासगी वैद्यकीय सेवा देणारी आस्थापने सतर्क झाली आहेत. आरोग्य विभागाच्या संचालकांनी भिवंडी शहरातील खासगी रुग्णालयांमध्ये महाराष्ट्र शुश्रूषा नोंदणी अधिनियम १९४९ मधील तरतुदींची तपासणी करण्याचे निर्देश पालिकेला दिले होते. या तक्रारीनंतर पालिकेने मेहेर हॉस्पिटलच्या व्यवस्थापनास हॉस्पिटलची नोंदणी रद्द केली होती. तसेच हॉस्पिटलमध्ये उपचार घेणाऱ्या रुग्णांना अन्य रुग्णालयांत पुढील उपचारासाठी पाठवण्याचे निर्देश देताना पुढील आदेशांपर्यंत कामकाज बंद करण्याची नोटीस बजावली होती, पण रुग्णालय व्यवस्थापनाने कायदेशीर बाबींची पूर्तता करून रुग्णालय सुरू ठेवले, पण घटनेमुळे शहरातील खासगी रुग्णालयांच्या व्यवस्थापनांमध्ये खळबळ माजली आहे.

### शासन नियमांच्या अंमलबजावणीची पडताळणी

**नर्सिंग होम रजिस्ट्रेशन (सुधारित) नियम २०२१ नुसार शासनाच्या नवीन नियमांची अंमलबजावणी करण्याचे काम शहरात सुरू केले आहे. भिवंडीतील खासगी रुग्णालयात या नियमांची अंमलबजावणी होते की नाही, याची तपासणी केली जात असल्याचे भिवंडी महापालिकेचे वैद्यकीय आरोग्य अधिकारी डॉ. संदीप गाडेकर यांनी सागितले.**

शहरात १४१ खासगी रुग्णालये भिवंडी शहरात महापालिकेची १९ प्राथमिक आरोग्य केंद्रे आहेत. १० स्व. बाळासाहेब ठाकरे दवाखाना, तर आठ आरोग्यवर्धिनी केंद्रे आहेत, तर इंदिरा गांधी स्मृती उपजिल्हा रुग्णालयदेखील आहे. असे असताना भिवंडीत महापालिकेच्या नोंदीनुसार १४१ खासगी रुग्णालये आहेत. त्यामुळे खासगी रुग्णालयांची वाढलेली संख्या चिंताजनक असून, बहुतांश ठिकाणी महाराष्ट्र नर्सिंग होम रजिस्ट्रेशन (सुधारित) नियम २०२१ शासनाच्या नवीन नियमांची अंमलबजावणी होत नसल्याची तक्रार आहे.

# जीवनदीप महाविद्यालय खर्डी येथे बहुविद्याशाखीय राष्ट्रीय चर्चासत्र संपन्न

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

खर्डी येथील कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय आणि IQAC विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने "जागतिकिकरणाचा भारतीय समाजावरील परिणाम " याविषयावर 'एकदिवसीय बहुविद्याशाखीय राष्ट्रीय चर्चासत्राचे आयोजन दि.04 मार्च 2025 रोजी करण्यात आले . या राष्ट्रीय चर्चासत्राचे उदघाट्न मुंबई विद्यापीठाच्या मानव्य आणि सामाजिक शास्त्र विभागाचे अधिष्ठाता डॉ. अनिल सिंग यांच्या हस्ते झाले.यावेळी चर्चासत्राचे बीजभाषक म्हणून डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाच्या माजी मराठी विभाग प्रमुख डॉ. सतीश बडवे, जी. शै. सं चे अध्यक्ष श्री. रवींद्र घोडविंदे उपस्थित होते.चर्चासत्रात मार्गदर्शक म्हणून मुंबई विद्यापीठाचे मराठी विभाग प्रमुख डॉ. विनोद कुमरे,डॉ. वासुदेव वले,




डॉ. विलास गायकर, डॉ. ताहेर पठाण तसेच या चर्चासत्रात जी. शै. सं चे संचालक श्री प्रशांत घोडविंदे, महाविद्यालयाचे प्राचार्य कैलास कळकटे उपस्थित होते. 'बदल हे जागतिकिकरणाचे सूत्र आहे तसेच जागतिकिकरणामुळे सामाजिक, सांस्कृतिक, आर्थिक क्षेत्रात झालेल्या बदलाचा चांगला व वाईट परिणाम .' याविषयी मत बिजभाषक डॉ. सतीश बडवे यांनी व्यक्त केले. मुंबई विदयापीठचे मराठी विभाग प्रमुख डॉ. विनोद कुमरे यांनी, "जागतिकिकरणामुळे जीवनाच्या सर्वच क्षेत्रात पडलेला सकारात्मक व नकारात्मक बदलाची चर्चा ' केली.डॉ. वासुदेव वले यांनी,"इतर भाषा जगातून घेण्यापेक्षा मराठी भाषा जगाला देणे " हा विचार मांडला.डॉ. विलास गायकर यांनी, "जागतिककरणामुळे आर्थिक, सामाजिक, पर्यटन क्षेत्रात झालेले परिणाम व बदलांची चर्चा केली व उपस्थितांना मार्गदर्शन केले.या जागतिकिकरणाच्या प्रभावाने ज्या ज्या क्षेत्रात परिणाम झालेत त्यावर काही मार्ग कसा काढता येईल यावर चर्चा झाली.या चर्चासत्रासाठी जवळपास ५७ अभ्यासकांनी वेगवेगळया विषयांवर शोधनिबंध लिहिले असून महाविद्यालयाच्या माध्यमातून या शोधनिबंधाचे प्रकाशन देखील करण्यात आले. या चर्चासत्राचे समन्वयक म्हणून डॉ विनोद होले , सहसमन्वयक म्हणून प्रा रसिका सपकाळ यांनी जबाबदारी पार पाडली. चर्चासत्राच्या यशस्वीतेसाठी प्रा विशाल भोसले, प्रा दिप्ती मोरे, प्रा प्रियंका पवार, प्रा शरद खाकर, प्रा सोनम मोरे, प्रा भुषण विशे यांनी मोलाची कामगिरी बजावली.



# ठाणे एसटी आगार बनले गर्दुल्ले, तृतीयपंथीयांचा अड्डा

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**ठाणे**: ठाणे रेल्वे स्थानक एसटी आगार गर्दुल्ले आणि गुंड प्रवृत्तीच्या तृतीयपंथीयांचा अड्डा बनला आहे. या आगारात रात्रीच्या वेळी दहशतीचे वातावरण असते. प्रवाशांची लूटमार करणे, आगाराच्या शौचालयात वेश्याव्यवसाय करणे असे प्रकार येथे चालतात. एकटी महिला अथवा असाह्य पुरुषावर येथे लैंगिक अत्याचार होण्याचा धोका असून आगाराची सुरक्षा पूर्णतः वाऱ्यावर आहे.

ठाणे रेल्वे स्थानकानजीकच्या एसटी आगारातून मीरा-भाईंदर, बोरिवली, जव्हार, वाडा, मोखाडा, मुरबाड, शहापूर, कल्याण, वसई, पालघर आदी भागात महामंडळाच्या बस जातात. येथून प्रवाशांना जाण्याकरिता इतर कोणतीही परवडणारी सार्वजनिक वाहने उपलब्ध नाहीत. रिक्षा मधून रात्रीचा प्रवास करणे असुरक्षित आणि महागडे असल्याने ठाणे रेल्वे स्थानकात रात्रीच्या वेळी उतरलेले प्रवासी एसटीवरच अवलंबून असतात. अशावेळी त्यांची शेवटची बस चुकली तर त्यांना एसटी आगाराचा आश्रय घ्यावा लागतो. रात्रीच्या वेळी मात्र येथे गर्दुल्ले आणि गुंडगिरी करणाऱ्या तृतीयपंथीयांचा वावर असतो. गर्दुल्ले, पाकीटमारांकडून प्रवाशांची लूटमार होते, तर गुंड प्रवृत्तीच्या तृतीयपंथीयांकडून देखील लुटमार आणि रात्रीच्या वेळी आगारातील शौचालयात वेश्या व्यवसाय केला जातो. असे असतानाही या आगारामध्ये एसटी महामंडळाची स्वतःची सक्षम सुरक्षा यंत्रणा उपलब्ध नाही. रात्री स्थानिक पोलिसांची एखादी गस्त होते, परंतु ते जाताच पुन्हा गर्दूल्ले आणि तृतीयपंथीयांचे राज सुरु होते. रात्री महाराष्ट्र सुरक्षा बोर्डाचा फक्त एक सुरक्षा रक्षक येथे असतो. निळ्या गणवेषातील या सुरक्षारक्षकाला हे गुंड दाद देत नाहीत. त्यांच्याजवळ ब्लेड, चाकू सारख्या धारदार वस्तू असतात असे सुरक्षकाने नाव न छापण्याच्या अटीवर सांगितले. तर काहीशी अशीच परिस्थिती खोपट, वंदना या आगारांसह जिल्ह्यातील इतर आगारांची आहे.

# पालिकेच्या निवडणुका आता दिवाळीनंतरच

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

नवी दिल्ली : मुंबई : स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकां संदर्भातील याचिकांवरील सुनावणी सर्वोच्च न्यायालयाने मंगळवारी पुन्हा ६ मेपर्यंत पुढे ढकलली असून न्यायालयाची उन्हाळी सुट्टी लक्षात घेता या याचिकांवर त्यानंतरच निर्णय होण्याची शक्यता आहे. पावसाळ्यात निवडणुका न घेण्याची राज्य निवडणूक आयोगाची भूमिका असल्याने या निवडणुका दिवाळीनंतरच होण्याची चिन्हे आहेत.

या याचिकांवर न्यायमूर्ती सूर्यकांत व न्यायमूर्ती एन के सिंग यांच्या खंडपीठापुढे मंगळवारी सकाळच्या सत्रात केवळ दोन मिनिटे शिल्लक असताना सुनावणी झाली. प्रभाग रचनेसंदर्भात कोणती कार्यवाही केली, याचा अनुपालन अहवाल न्यायालयात सादर करावा व ओबीसींना आरक्षण दिले आहे का, याची माहिती राज्य सरकार किंवा राज्य निवडणूक आयोगाने द्यावी, अशी विनंती ज्येष्ठ विधिज्ञ इंदिरा जयसिंग यांनी केली. न्यायालयाच्या ४ मे २०२२ च्या आदेशानुसार यापूर्वीच राज्य निवडणूक आयोगाने ओबीसींना राजकीय आरक्षण देऊन त्या संदर्भातला अनुपालन अहवाल सर्वोच्च न्यायालयात सादर केला आहे, अशी माहिती याचिकाकर्त्यांच्या वतीने ॲड. देवदत्त पालोदकर यांनी खंडपीठास दिली. महान्यायवादी तुषार मेहता म्हणाले, ओबीसी आरक्षणाचा मुद्दा सध्या शिल्लक राहिलेला नसून पूर्वी प्रचलित असलेल्या सदस्य संख्या व प्रभाग रचनेप्रमाणे आयोगाने निवडणुकीची कार्यवाही करावी, अशी याचिकाकर्त्यांची मागणी आहे. मात्र मध्यंतरीच्या काळात राज्य सरकारने कायद्यांमध्ये मोठे फेरबदल केले आहेत. त्यानुसार नव्याने कार्यवाही करावी, अशी आमची विनंती असल्याचे खंडपीठास सांगितले. त्यानंतर काही मध्यस्थ अर्जदारांतर्फे ओबीसी आरक्षणासंदर्भात युक्तिवाद करण्यात आला. ओबीसींना देण्यात आलेल्या राजकीय आरक्षणास कोणत्या याचिकेमध्ये आव्हान दिले आहे, असे खंडपीठाने वारंवार विचारले असता आम्ही ओबीसी आरक्षणास आव्हान दिलेले नाही, प्रलंबित निवडणुका लवकर घेण्यासंदर्भात याचिका आहे, असे याचिकाकर्त्यांनी स्पष्ट केले.



# गीतासार



**ज्ञानकर्मसंन्यासयोगः**

न मां कर्माणि लिम्पन्ति न मे कर्मफले स्पृहा । इति मां योऽभिजानाति कर्मभिर्न स बध्यते ॥ ४-१४ ॥

कर्मांच्या फळांची मला स्पृहा नाही, त्यामुळे कर्मे मला लिप्त करीत नाहीत. अशा प्रकारे जो मला तत्त्वतः जाणतो, त्यालाही कर्मांचे बंधन होत नाही. ॥ ४-१४ ॥

एवं ज्ञात्वा कृतं कर्म पूर्वैरपि मुमुक्षुभिः । कुरु कर्मैव तस्मात्त्वं पूर्वैः पूर्वतरं कृतम् ॥ ४-१५ ॥

पूर्वीच्या मुमुक्षूंनीसुद्धा अशा प्रकारे जाणूनच कर्मे केली आहेत. म्हणून तूही पूर्वजांकडून नेहमीच केली जाणारी कर्मेच कर. ॥ ४-१५ ॥

किं कर्म किमकर्मेति कवयोऽप्यत्र मोहिताः । तत्ते कर्म प्रवक्ष्यामि यज्ज्ञात्वा मोक्ष्यसेऽशुभात् ॥ ४-१६ ॥

कर्म काय व अकर्म काय याचा निर्णय करण्याच्या बाबतीत बुद्धिमान मनुष्यही संभ्रमात पडतात. म्हणून ते कर्माचे तत्त्व मी तुला नीट समजावून सांगेन. ते कळले की तू अशुभापासून म्हणजेच कर्मबंधनातून सुटशील. ॥ ४-१६ ॥

कर्मणो ह्यपि बोद्धव्यं बोद्धव्यं च विकर्मणः । अकर्मणश्च बोद्धव्यं गहना कर्मणो गतिः ॥ ४-१७ ॥

कर्माचे स्वरूपही जाणले पाहिजे आणि अकर्माचे स्वरूपही जाणले पाहिजे. तसेच विकर्माचे स्वरूपही जाणले पाहिजे. कारण कर्मांचे तात्त्विक स्वरूप समजण्यास कठीण आहे. ॥ ४-१७ ॥

## किचन टिप्स

# टोमॅटोची साठवण

काही लोकांना टोमॅटो इतका आवडतो की ते जेवणासोबत कच्चे टोमॅटोचे काप खातात. अशावेळी जेव्हा आपण बाजारात भाज्या खरेदी करायला जातो तेव्हा एकाच वेळी 1-2 किलो टोमॅटो खरेदी करतो आणि फ्रिजमध्ये आणून ठेवतो. यासोबत भाजीपाला काही दिवस फ्रिजमध्ये ठेवणे चांगले आहे. पण जास्त वेळ फ्रिजमध्ये ठेवून खाणे आरोग्यासाठी चांगले नाही. पण तुम्हाला माहित आहे का की फ्रिजमध्ये टोमॅटो कधी ठेऊ नये? जर तुम्ही सुद्धा टोमॅटो फ्रिजमध्ये ठेवत असाल तर आजच ही सवय बदला. अशातच टोमॅटो फ्रिजमध्ये का ठेवू नयेत आणि ते साठवण्याचा योग्य मार्ग कोणता आहे हे जाणून घेऊयात.

मास्टर शेफ पंकज भदौरिया यांनी त्यांच्या इंस्टाग्राम अकाउंटवरून एक व्हिडीओ शेअर केला आहे ज्यामध्ये त्यांनी टोमॅटो फ्रिजमध्ये का ठेऊ नये याबद्दल सांगितले आहे. कारण टोमॅटो फ्रिजमध्ये ठेवल्याने त्याची चव खराब होऊ शकते. थंड तापमानामुळे टोमॅटोमधील एन्झाईम्स त्यांच्या पेशी सक्रिय राहत नाही, ज्यामुळे टोमॅटो मऊ होतात. त्यासोबत टोमॅटोचा पोत देखील खराब होतो. फ्रीजचे तापमान टोमॅटो मधील पोषक घटकांना बदलते. टोमॅटो साठवून ठेवण्याची योग्य पद्धत टोमॅटो फ्रीजमध्ये ठेवण्याऐवजी तुम्ही ते बाहेर थंड आणि कोरड्या जागी ठेवावे. पण यासाठी टोमॅटोचे हिरवे देठ काढून टाकणे सर्वात महत्वाचे आहे. आता ते एका प्लेट किंवा ट्रेमध्ये देठ काढलेली बाजू खाली ठेवा असे केल्याने टोमॅटो लवकर खराब होत नाही, आणि मऊ देखील पडत नाही. तसेच टोमॅटोची चवही बदलणार नाही. चव तशीच राहील. तसेच त्यांना ओलाव्याची कमतरता भासणार नाही.

# सावरकर नगर येथे गरजू रुग्णांना औषध वाटप




दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता /

ठाणे : प्रधानमंत्री भारतीय जन औषधी केंद्र सावरकर नगर ठाणे येथे 7 वा जन औषधी दिनानिमित्त मोफत आरोग्य शिबीर व गरजू रुग्णांना मोफत औषध वाटप या कार्यक्रमाचे आयोजन श्री गजानन मधुकर गायकवाड व सौ कल्पना गजानन गायकवाड यांच्या पुढाकाराने करण्यात आले होते. सदर कार्यक्रमाचा विभागातील पाच ते सहा हजार नागरिकांनी लाभ घेतला सदर कार्यक्रमात प्रमुख उपस्थिती कार्यसम्राट माजी नगरसेवक व कोपरी पाचपांखाडी विधानसभा समन्वयक श्री एकनाथ अनंत भोईर व वागळे प्रभाग समिती च्या माजी अध्यक्षा माजी नगरसेविका मा. सौ. एकता ताई भोईर, सिद्धिविनायक हॉस्पिटल चे डॉक्टर अमोल गीते GST विभागाचे अधिकारी मा. श्री. संजय पोलसाने, राष्ट्रीय मराठा महासंघाचे बन्सीदादा डोके, भाजप उपाध्यक्ष व मराठा समाजाचे नेते रमेश आंब्रे, जन औषधी कार्यालयाच्या हेमनी नेगी मॅडम, मंत्रालय वार्ताहर पत्रकार संघाचे अध्यक्ष दिलीप सपाटे, युवा सेना ठाणे लोकसभा उपाध्यक्ष श्री यज्ञेश भोईर, सर्व शिवसेना उपविभाग प्रमुख, शाखाप्रमुख, शिवसैनिक पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते सदर कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी फार्मासिस्ट रवी कुमार खंदारे, सचिन कवडे ओमकार पवार, वैभव उतेकर, प्रकाश खैरे, सतीश देशमुख सर, राजेश देशमुख सर, प्रकाश कुंडले सर, तसेच सिद्धिविनायक हॉस्पिटल, वागळे इस्टेट डॉक्टर असोसिएशन, मेयर ऑरगॅनिक, ठाणे जिल्हा रुग्णालय, एकनाथ आय केअर हॉस्पिटल, जिजाऊ सामाजिक संस्था या सर्वांनी अथक परिश्रम घेतले या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन अनिल काकुळते सर यांनी केले.

तर उपस्थित सर्वांचे कार्यक्रमाचे आयोजक श्री गजानन मधुकर गायकवाड व सौ कल्पना गजानन गायकवाड यांनी यावेळी सर्वांचे आभार व्यक्त केले.


# वणव्यांनी मुरबाडचे डोंगर काळवंडले

## वन खात्याकडून कायमस्वरूपी उपयोजना करण्याची काळाची गरज!

सह्याद्रीच्या पायथ्याशी वसलेला मुरबाड तालुक्याला निसर्ग संपत्तीचे वरदान लाभले असताना वनवे मात्र शाप होऊ पाहत आहे. दरवर्षी फेब्रुवारी, मार्च, एप्रिल, मे, यादरम्यान जंगलाला मोठ्या प्रमाणात वनवा लागला जातो यामध्ये सरपटणारे प्राणी व इतर प्राणी हे सुद्धा हजोराच्या संख्येने दरवर्षी मृत्युमुखी पडत आहेत ही ही बाब मात्र गंभीर स्वरूपात दिसून येत आहे. डेरेदार वृक्ष, लतावेली हिरवी, वनराई गर्द, झाडी विपुल प्रमाणात असलेली पशुपक्षी नैसर्गिक रानमेवा, डिंक, मध, हजारो वनौषधी यांचा निसर्ग खजिना मुरबाडच्या जंगलात विपुल प्रमाणात आहे.

मात्र आज सर्वत्र डोंगरांना व सह्याद्री पर्वताला मानवनिर्मित आगी लावण्याचे प्रमाण मोठ्या प्रमाणात वाढले असून वनव्याने निसर्ग संपत्ती जळून खाक होत आहे. त्यासाठी वन खात्याने तात्काळ या बाबीकडे लक्ष वेधून कायमस्वरूपी उपयोजना करणे काळाची गरज असल्याचे चित्र सध्याच्या घडीला दिसून येत आहे. निसर्ग आणि मानवाचे नाते अतूट असून निसर्गावरच मानवी जीवन अवलंबून आहे मात्र केवल स्वार्थासाठी माणूस निसर्गाचा वापर करताना दिसत नाही आगपेटीच्या एका गाडीने हिरव्याने भरलेली डोंगररांग क्षणार्धात बेचिराख होत आहे. वन वनवे नियंत्रण आणण्यात वन विभागाला आज कित्येक वर्षापासून अपयश येत असल्याचे दिसून येत आहे. वनांचे रक्षण करण्याऐवजी त्यांचे भक्षण झाल्याचे वनविभागाला उघड्या डोळ्यांनी बघावे लागत आहे डोंगरांना योग्य जालरेषा घेणे शिकाऱ्यांचा बंदोस्त करणे सरपणासाठी आग लावणाऱ्या विरुद्ध कारवाई करणे वृक्षतोड, थांबवणे, कुरणांचा योग्य वापर करणे वन दक्षता समितीमार्फत पर्यावरण जनजागृती करणे यामध्ये लोकप्रतिनिधी, शासन, शेतकरी, जनता प्रसामाध्यम या सर्वांचा व्यापक कृतीयुक्त सहभाग याच बाबी वनवे प्रतिबंध करू शकतात. मात्र यासाठी इच्छाशक्तीची गरज असल्याची खंत वनप्रेमी व्यक्त करत आहेत







### दरवर्षी हजारो सरपटणारे प्राणी पडतात मृत्यूमुखी!

**वन वनवे हा निसर्ग शक्तीसाठी कलंक बनला असून अब्जावधी रुपयाची अमूल्य संपदा दुर्मिळ वनौषधी करोड जीवजंतू कीटक नष्ट होत आहेत. वनव्यामुळे तापमानात वाढ होत आहे. परिणामी उष्णतेचा असह्य झळा निर्होमाण ऊन पर्यावरणाचा -हास होत आहे.**

**– चिमा खंडवी, शेतकरी निसर्गप्रेमी**

**– बाळासाहेब भालेराव**

# केडीएमसीच्या प्रादेशिक पर्यटन विकासाच्या प्रस्तावास मंजुरी द्या

## अर्थसंकल्पीय अधिवेशनात घेतली पर्यटन मंत्री शंभूराज देसाई यांची भेट घेत केली मागणी

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता /

कल्याण : ठाणे जिल्हा नियोजन समितीने प्रादेशिक पर्यटन विकास योजनेअंतर्गत पर्यटन विभागाला सादर केलेल्या कल्याण डोंबिवली महानगरपालिकेच्या प्रस्तावांना मंजुरी देऊन निधी उपलब्ध करून देण्याची मागणी भाजपचे माजी आमदार नरेंद्र पवार यांनी केली आहे. यासंदर्भात नरेंद्र पवार यांनी अर्थसंकल्पीय अधिवेशनादरम्यान राज्याचे पर्यटन मंत्री शंभूराज देसाई यांची भेट घेतली.

ठाणे जिल्हा नियोजन समितीने पर्यटन योजना २०२३-२४ अंतर्गत पर्यटन विभागाचे सह संचालकांकडे गेल्या वर्षी हा कल्याण डोंबिवली महानगरपालिकेचा प्रस्ताव सादर केला आहे. ज्यामध्ये टिटवाळा येथील श्री महागणपती मंदिर परिसरातील उद्यानाचे सुशोभीकरण, श्री गणेश मंदिर परिसरातील सुशोभीकरण, श्री गणेश मंदिरातील दर्शन रांगेमध्ये रेलिंग लावणे - रॉड टाकणे, श्री गणेश मंदिर परिसरातील उद्यानात आसन व्यवस्था उभारून विकासकामे करणे, श्री गणेश मंदिराबाहेरील पार्किंग परिसरात आवश्यक कामे करणे आणि पाण्याचा सुयोग्य निचरा होण्यासाठी नाला बंदिस्त करणे यासह टिटवाळा महागणपती मंदिर परिसरातील तलावाचे सुशोभीकरण करणे अशा महत्त्वाच्या सहा विकासकामांचा या प्रस्तावात समावेश असल्याची माहिती माजी आमदार नरेंद्र पवार यांनी दिली आहे.


कल्याण-डोंबिवली महानगरपालिकेने या ६ विकासकामांचे सविस्तर अंदाजपत्रक आणि आराखडे तांत्रिक मान्यतेसह प्रशासकीय मान्यता तसेच निधी उपलब्ध करण्यासाठी पर्यटन विभागाकडे सादर केले आहेत. या प्रस्तावाला लवकरात मान्यता देऊन १ कोटी ५० लाख रुपयांचा निधी मंजूर करण्याचे आदेश संबंधित विभागाला द्यावेत अशी आग्रही मागणी पवार यांनी पर्यटन मंत्री शंभूराज देसाई यांच्याकडे केली आहे.

दरम्यान पर्यटन मंत्री शंभूराज देसाई यांनीही या मागणीला सकारात्मक प्रतिसाद देत यासंदर्भात लवकरात लवकर आवश्यक ती कार्यवाही करण्यात येईल असे आश्वस्त केल्याचेही माजी आमदार नरेंद्र पवार यांनी सांगितले आहे. त्यामुळे येत्या काळात टिटवाळा येथील श्री महागणपती मंदिर परिसराचा कायापालट होण्यास मोठी मदत होणार आहे.



# शिक्षकाने सजविलेली शाळा ठरली आदिवासी बांधवांचे आकर्षण




दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

मुरबाड : तालुक्यातील माळशेज घाटाचे पायथ्याशी असलेल्या न्याहाडी येथील पुरातन शाळा नामशेष होण्याच्या मार्गांवर असताना त्या शाळेची अंकुश घरत या अवलिया शिक्षकाने दारोदार फिरत दानशूर व्यक्ती तसेच माजी विद्यार्थांकडुन मदत घेत शाळेची डागडुजी तसेच छप्परावरचे नवीन पत्रे, खिडक्या, स्वच्छतागृह, असे जणू काही एक्सप्रेसच्या डब्या प्रमाणे रंगछटा साकारत आदिवासी बांधवांना रेल्वे एक्सप्रेसचे दर्शन घडविले असल्याने हि शाळा म्हणजे माळशेज घाटात येणाऱ्या पर्यटकांना व आदिवासी बांधवांनाचे आकर्षण ठरत आहे. त्यामुळे शिक्षक अंकुश घरत यांच्या अभिनव उत्कृष्ट कामगिरीची सर्वत्र चर्चा होत आहे.

माळशेज घाटाचे पायथ्याशी असलेल्या न्याहाडी जिल्हा परिषदेच्या केंद्र शाळेत इयत्ता सातवी पर्यंत विद्यार्थी शिक्षण घेत आहेत. परंतु पुरातन असलेल्या या शाळेची देखभाल व दुरुस्ती होत नसल्याने ती शाळा नामशेष होत चालली होती. दरम्यान या शाळेवर १९९६ मध्ये कार्यरत असलेले अंकुश घरत यांची पुन्हा त्याच शाळेवर नेमणुक झाल्याने त्यांनी चोवीस पटसंख्या असलेल्या शाळेची झालेली दयनीय अवस्था पाहता माजी विद्यार्थी असलेल्या पालकांकडे धाव घेतली व आपले विद्यार्थी काय करतात याचा मागोवा घेतला असता अनेक विद्यार्थी हे शासकीय नोकरी करत असल्याने घरत यांना आपण केलेल्या मेहनतीचे प्रतिबिंब पालकांच्या चेहऱ्यावर पहावयास मिळाले. असता सर्व माजी विद्यार्थ्यांना घरत यांनी शाळेत चहापान साठी निमंत्रित केले असता शाळेचे रुपडे बदलण्यासाठी त्यांनी विद्यार्थ्यांकडे एक प्रकारे गुरुदक्षिणाच मागितली, सर्व माजी विद्यार्थ्यांनी आपले योगदान देण्यास सरसावले. त्यामध्ये स्टेट बँकेत व्यवस्थापक असलेल्या नेताजी देशमुख यांनी स्वतः चे योगदान देत बँकेचा सी.एस.आर फंड शिक्षकांचे व पालकांचे मागणीनुसार शाळेला वर्ग केला आणि शाळचे रुपडे बदलण्यास सुरुवात झाली. शिक्षकांनी या नामशेष होणाऱ्या शाळेचे रेल्वेच्या एक्सप्रेस मध्ये रुपांतर केले असल्याने पर्यटन क्षेत्र म्हणून प्रसिद्ध असलेल्या माळशेज घाटात अनेक पर्यटक येतात ते या शाळेला आवर्जून भेट देत असतात त्यामुळे अनेक सहकारी संस्था या शाळेचे सौंदर्य पाहून स्वतः हुन शाळेला मदत करण्यासाठी पुढे येतात. शाळेत झालेला बदल पाहता विद्यार्थ्यांचे पालकांना देखील मुलभूत सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी घरत हे गरजु विद्यार्थ्यांचे पालकांना स्वखर्चाने जीवनावश्यक वस्तू देत असुन त्यांची तहान भागविण्यासाठी शासनाचे निधीची वाट न पाहता सहकारी संस्था कडून मदत घेत नळ पाणीपुरवठा योजना सुरू केली असुन आदिवासी बांधवांना चोवीस तास पिण्याचे पाणी उपलब्ध करून दिले आहे. हे शिक्षक केवळ शाळेच्या वेळेत गावात येत नाहित तर विद्यार्थ्यांची गुणवत्ता वाढविण्यासाठी ते रविवारी देखील शाळेत हजेरी लावत असल्याने शाळेच्या गुणवत्तेचा दर्जा वाढत असल्याने विविध उपक्रमांचे माध्यमातुन विद्यार्थी व शिक्षकांचा गौरव होत आहे.

**घरत सरांनी आम्हाला ज्याप्रमाणे घडविले त्याप्रमाणे आमच्या मुलांना घडविण्याची संधी मिळाली आहे. शिवाय आम्ही ज्या जुन्या शाळेत बसुन धडे गिरवत होतो. ती शाळा आता एक्सप्रेसच्या रुपात पहावयास मिळत आहे. हि किमया अंकुश घरत सर यांनी केली आहे**

**– दगडु वाघ – पालक**

# आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री प्रकाश आबिटकर यांच्या शुभहस्ते नवीन रुग्णालयाच्या इमारतीचे भूमिपूजन

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

रायगड : अलिबाग येथील जिल्हा रुग्णालय, रायगड च्या 300 खाटांच्या नवीन आंतररुग्ण इमारतीच्या बांधकामाचे भूमिपूजन बुधवार दि.05 मार्च रोजी सायंकाळी 4.00 वा. सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री प्रकाश आबिटकर यांच्या शुभहस्ते तर महिला व बाल विकास मंत्री कु.आदिती तटकरे तसेच रोजगार हमी योजना, फलोत्पादन व खारभूमी विकास मंत्री भरत गोगावले यांच्या प्रमुख उपस्थितीत संपन्न होणार आहे. यावेळी खासदार धैर्यशील पाटील, श्रीरंग बारणे, सुनिल तटकरे आणि आमदार सर्वश्री ज्ञानेश्वर म्हात्रे, विक्रांत पाटील, निरंजन डावखरे, रविंद्र पाटील, प्रशांत ठाकूर, महेंद्र थोरवे, महेश बालदी आणि महेंद्र दळवी आदी मान्यवर उपस्थित उपस्थित राहणार आहेत.

# वाल्मिक कराडला फाशी द्या

## शिवसेनेचे आंदोलन



### राज्यभर आंदोलन करण्याचा इशारा

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

मुंबई: ४ मार्च २०२५ बीडमधील सरपंच संतोष देशमुख हत्याकांडातील प्रमुख आरोपी वाल्मिक कराड याला फाशी द्या, या मागणीसाठी आज मंगळवारी शिवसेनेने मुंबईत जोरदार आंदोलन केले. संतोष देशमुख यांच्या अमानुष मारहाणीचे फोटो व्हायरल झाल्यानंतर राज्यभरात संतापाची लाट उसळली आहे. त्याचे पडसाद आज मुंबईत उमटले. शिवसेनेने वाल्मिक कराडला फाशी देण्याची मागणी केली. शिवसेना मध्यवर्ती कार्यालय बाळासाहेब भवन येथे शिवसेना महिला आघाडीकडून वाल्मिक कराडविरोधात आंदोलन करण्यात आले. वाल्मिक कराडच्या पुतळ्याला जोडे मारण्यात आले. वाल्मिक कराड ही प्रवृत्ती आहे. काल व्हायरल झालेल्या फोटोंमधून या हत्याकांडाची भीषणता दिसून आली. अशा गोष्टी महाराष्ट्रात होतात हे लाजीरवाण आहे. वाल्मिक कराडला केवळ शिक्षा होऊन चालणार नाही. आरोपींना फाशी झालीच पाहिजे, ही शिवसेनेची प्रमुख मागणी आहे. यासाठी राज्यभरात शिवसेना रान उठवेल, असे शिवसेनेच्या उपनेत्या शीतल म्हात्रे म्हणाल्या. यावेळी शिवसेना नेत्या मीनाताई कांबळी, तृष्णा विश्वासराव, संध्या वढावकर, कला शिंदे, उपनेते अनंदराव जाधव, अनिल पडवळ, युवासेना कार्यकारणी सदस्य निखिल जाधव यांच्यासह इतर पदाधिकारी उपस्थित होते

# चिंचवलीत बिगाऱ्याची हत्या




दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

कल्याण : कल्याण ग्रामीण पोलीस स्टेशनच्या हद्दीतील चिंचवली गावाच्या परिसरात समृद्धी महामार्गाचे सुरू असलेल्या कामाच्या बिगाऱ्याची निर्घृण हत्या झाल्याची घटना सोमवारी घडल्याने पंचक्रोशीत खळबळ उडाली आहे.

टिटवाळा पोलीस स्टेशन च्या हद्दीतील चिंचवली गाव परिसरात समृद्धी महामार्गाचे काम सुरू असून या ठिकाणी काम करणारा बिगारी सागर ऊर्फ पिंटु सुरेश गोथडे, वय – 35 वर्ष, राहणार - मु.पो. सप्तश्रृंगी, ता. कळवण, यांचा मृतदेह मधुकर कशिवले यांनी राहण्यास दिलेल्या शेडच्या परिसरात आढळल्या बाबत पोलीस पाटील यांनी टिटवाळा पोलिसांना माहिती दिली. त्या अनुषंगाने टिटवाळा पोलिसांनी घटनास्थळी पोहचत पंचनामा करीत मधुकर कशिवले यांच्या तक्रारी वरून गुन्हा दाखल केला असून पोलीस सूत्रांकडून मिळालेल्या माहितीनुसार निर्घृण हत्या झालेला सागर हा समृध्दी महामार्गाच्या कामाच्या ठिकाणी बिगारी कामकाज करणारा आहे.

या हत्या प्रकरणी आरोपींचा शोध घेण्याकरिता 2 ते 3 पथके नेमण्यात आली असून आरोपींचा शोध सुरु असल्याबाबत टिटवाळा पोलीस स्टेशन चे तपास अधिकारी एपीआय नितीन मूगदूम यांनी माहिती दिली.

news.thanejeevandeep@gmail.com
दैनिक ठाणे जीवनदीप
WhatsApp Channels
Follow, Unfollow, & Create Them
महाराष्ट्राच्या ग्रामीण व शहरी भागातील लोकप्रिय दैनिक
दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता
मुंबई • नवी मुंबई • ठाणे • रायगड • पालघर
मुख्य संपादक : रवींद्र नारायण घोडविंदे
कार्यकारी संपादिका : डॉ. प्रतिक्षा रवींद्र घोडविंदे (एम. डी.)
9619188558 / 9082664781
www.jeevandeepvarta.com/
आपलं हक्काचं दैनिक, दररोज वाचा.

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

# मान्सूनपूर्वीच नालेसफाई



## ठाणे महापालिकेचा दावा

### ठाणे महापालिकेने काढली निविदा, 10 कोटी 29 लाखांचा खर्च अपेक्षित

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**ठाणे** : ठाणे महापालिका हद्दीत यंदा पावसाळ्यापूर्वी नालेसफाईच्या कामांना सुरुवात होणार असल्याचा दावा ठाणे महापालिकेच्या घनकचरा विभागाने केला आहे. महापालिकेच्या घनकचरा विभागामार्फत नऊ प्रभाग समितीअंतर्गत नालेसफाईच्या कार्माच्या निविदा काढण्यात आल्या असून, याच महिन्यात २५ मार्चपर्यंत कामाचे कार्यादेश दिले जातील, असेही सांगितले जात आहे. मागील वर्षी नाले सफाईसाठी ९ कोटी १५ लाखांचा खर्च करण्यात आला होता.

**मागील वर्षी पेक्षा यंदाच्या वर्षी दोन महिने आधीच निविदा प्रक्रिया राबविण्यात येत आहे. त्यामुळे यंदा नालेसफाईची कामे वेळेत सुरू होण्याची शक्यता आहे. या वर्षी खर्च वाढला असला, तरी काही ठिकाणी नाल्यांची लांबी वाढल्याने हा खर्च वाढल्याचा दावा महापालिकेकडून करण्यात आला आहे.**

यंदा मात्र हाच खर्च १०.२९ कोटींचा असणार असल्याची माहिती महापालिकेने दिली आहे. यंदा पावसाळ्यात पाणी तुंबून दुर्घटना घडू नये, यासाठी पालिकेने वेळेत नालेसफाई व्हावी, यासाठी नियोजन प्रभाग आखले आहे. ठाणे पालिका प्रशासनाच्या वतीने यंदाच्या २०२५-२६ या वर्षासाठी पालिका क्षेत्रातील समितीअंतर्गत मुख्य नाले आणि त्यास जोडणारी लहान-मोठे नाले असे ३८४.९१ किमी नाल्यांची सफाई करण्यात येणार आहे. त्यासाठी १० कोटी २९ लाखांचा खर्च अपेक्षित धरण्यात आला आहे. या नालेसफाईच्या कामाची निविदा प्रसिद्ध झाली आहे.

# योगाचा सराव बालवयातच रुजवा -योगाचार्या वीणा निमकर

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

कल्याणातील आपलं प्रतिष्ठान ह्या संघटनेच्या विद्यमाने भगवान शंकर योगाचे जनक म्हणून ओळखले जात असल्याने महाशिवरात्रीच्या निमित्ताने ८ ते १२ वयोगटातील मुलांसाठी महापालिकेसमोरील स्वामी नारायण हॉल येथे योग स्पर्धा आयोजित करण्यात आल्या होत्या . त्यावेळी मार्गदर्शन करत असतांना योगाचार्या वीणा निमकर बोलत होत्या . या स्पर्धेचे उद्घाटन बेबी काकडे यांच्या हस्ते करण्यात आले . यावेळी महापलिकेचे रितेश जाधव , दिनेश ठक्कर , कुमुदिनी देसाई , सुनंदा जाधव आणि आपलं प्रतिष्ठानचे अध्यक्ष अनिल काकडे उपस्थित होते. यावेळी वीणा निमकर पुढे म्हणाल्या की, लहान मुलांची स्मरणशक्ती आणि त्यांची अभ्यासातील एकाग्रता वाढवण्यासाठी योगा फायदेशीर ठरतो नियमित योगा केल्याने शरिर




लवचिक , चपळ होते आणि मुलांचे मानसिक आरोग्य उत्तम राहते. त्यामुळे लहान मुलांनी योगासनाचा नियमित सराव करावा.

याप्रसंगी आपल्या उदघाटनापर भाषणात बेबी काकडे म्हणाल्या की मुलांचे शारिरिक आणि मानसिक आरोग्यासाठी योगा अत्यंत उत्तम माध्यम आहे . योगासनामुळे मुलांचा अभ्यासातील ताणतणाव दूर होतो. योगासनाने मुलांची एकाग्रता तर वाढतेच पण श्वास घेण्याची क्षमता आणि शरिराची ऊर्जा पातळीची वाढण्यासही मदत होते . योगासनाचा नियमितपणे सराव केल्याने मुलांची उंची देखिल वाढते.

ह्या योग स्पर्धेसाठी सर्वश्री श्रीकांत शेलार,सुहास बडंबे ,दिपेश भोईर, देवेंद्र आजगोलकर ,अनिकेत सावंत, सरस्वती व्हनमाने ,वैशाली कांगुणे इत्यादींनी पंच म्हणून काम पाहिले.

कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी सर्वश्री एकनाथ पवार,सुनील कोळी,सारिका मांगले ,सृष्टी तांबे, मंगल गुंजाळ,रमेश कदम,संजना चव्हाण, अर्चना शिंदे, शमिका बागुल इत्यादींनी परिश्रम घेतले

# प्रदीप वाघ यांना ' लोकनेता ' पुरस्कार

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**जव्हार** -जितेंद्र मोरघा मोखाडा तालुक्यातील जनतेची अव्याहातपणे सेवा करणारे मोखाडा पंचायत समितीचे माजी सभापती तथा आदिवासी संघर्ष हक्क समितीचे संस्थापक, अध्यक्ष प्रदीप वाघ यांना नाशिक लोकमत समूहाकडून " लोकनेता " पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले. नाशिक येथील हॉटेल एक्सप्रेस इन या पंचतारांकित हॉटेलमध्ये लोकमत समूहाचे उपाध्यक्ष बी. बी. चांडक आणि वृत्तसंपादक मिलिंद कुलकर्णी यांच्या शुभहस्ते प्रदान करण्यात आला.राजकारण अन् समाजकारण या एकाच नाण्याचा दोन बाजू. या दोहोंची मोट बांधत समाजाच्या हितासाठी धडपडणारे प्रदीप वाघ पालघर जिल्ह्याच्या विकासात मोलाची भूमिका बजावत असून समाजकंटाकाप्रती संवेदनशीलता, कठोर परिश्रम आणि वेळेच्या पल्याड जाऊन दिलेलं समर्पण ही सामाजिक भावनेतून असलेली जनसेवा नव्या पिढीसाठी अनुकरणीय आणि प्रेरणादायी आहे.

याच कार्याला मिळालेली लोकमान्यता ही लोकनेता असल्याचे अधोरेखित करते. म्हणून या समजकारणाच्या गौरवास्पद कार्याला आणि महत्वपूर्ण योगदानाला लोकमत समूहातर्फे प्रदीप वाघ यांना सन्मानित करण्यात आले.मोखाडा तालुक्यातील अतिदुर्गम भागात जात- पात, धर्म बाजूला सारून लोकांप्रति प्रामाणिकपणे सामाजिक कार्य सुरु असून सामाजिक, शैक्षणिक, कला, क्रीडा आणि राजकीय क्षेत्रातील त्यांचा आलेख उंचावत आहे.

लोकांच्या समस्या जाणून घेणे आणि त्या प्रामाणिकपणे सोडविण्याचा प्रयत्न करणे याच लोकनेत्याच्या गुणांचा कार्यगौरव व्हावा म्हणून लोकमत समूहातर्फे प्रदीप वाघ यांना लोकनेता पुरस्कार प्रदान करून गौरविण्यात आले. महाराष्ट्रातील अग्रगण्य दैनिक लोकमतकडून मिळालेल्या हा बहुमान मी आदिवासी जनतेसाठी समर्पित करत असल्याचे प्रदीप वाघ यांनी सांगितले.

# ठाण्यातील वैद्यकीय सेवा कोलमडली

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**ठाणे** : ठाणे महापालिकेच्या छत्रपती शिवाजी महाराज रुग्णालय, राजीव गांधी वैद्यकीय महाविद्यालय आणि मीनाताई ठाकरे परिचर्या प्रशिक्षण संस्थेत मनुष्यबळाची कमतरता असून, ४५४ पदे रिक्त आहेत. मध्यंतरी रुग्णालयासाठी आकृतीबंध मंजूर झाला. काही पदे भरली गेली असली तरी अनेक पदे रिक्त आहेत.




### १६४ पदे आजही रिक्त

छत्रपती शिवाजी महाराज रुग्णालयात रोज २००० ते २२०० रुग्ण ओपडीत येतात. सद्यःस्थितीत येथे ५०० खाटा आहेत. डॉक्टर, तज्ज्ञांची ८०० जणांची फौज रुग्णालयात आहे. मीनाताई ठाकरे परिचर्या प्रशिक्षण संस्थेमध्येही २५ पदे रिक्त असून, अवधी सहा पदे भरली आहेत. तब्बल १९ पदे रिक्त आहेत. वर्ग २ मध्ये २१ पदे मंजुर असून, त्यातील चार भरली असून, १७ रिक्त आहेत. विद्यार्थ्यांना शिकविण्यासाठी ४३५ पदे मंजूर असली, तरी २९४ पदे रिक्त आहे. वर्ग १ ची २४१ पदे मंजूर असली, तरी त्यातील केवळ ७७ पदे मंजूर असून, १६४ रिक्त आहेत.

### राजीव गांधी वैंद्यकीय महाविद्यालयातही मनुष्यबळाची कमतरता

### खिडक्यांच्या संख्येत वाढ

**आयसीयूमध्ये आवश्यक मनुष्यबळ देण्यात आले. कळवा रुग्णालयात वेळेत उपचार मिळावेत, यासाठी खिडक्यांची संख्या वाढविण्यात आली. सध्या केसपेपरसाठी- १०, औषध - ८, ईसीजी व इतर-३, इतर सहा व अपघात-३, पॅथालॉजी-२ अशा साधारपणे २७खिडक्या कार्यरत आहेत. असे असले तरी देखील आजही रुग्णालयात आजही वर्ग १ ते ४ मध्ये १४१ पदे रिक्त आहेत.**

# आदिवासी न्याय महाअभियानांतर्गत सहा हजार ४६२ घरकुलांना मंजुरी

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**ठाणे दि. ४** - भारताचे प्रधानमंत्री यांनी जनजाती गौरव दिनानिमित्त प्रधानमंत्री जनजाती आदिवासी न्याय महा अभियान सुरू केले आहे. देशातील ७५ विशेषत: असुरक्षित आदिवासी गटांचा विकास करणे हा या अभियानाचा उद्देश आहे. प्रधानमंत्री जनजाती आदिवासी न्याय महा अभियान अंतर्गत आदिम जमातीतील पात्र कुटुंबांसाठी देशात ४.९० लाख लाभार्थ्यांना लाभ देण्यात आला आहे. त्याच धर्तीवर ठाणे जिल्हयातील अंबरनाथ, भिवंडी, मुरबाड, शहापूर व कल्याण तालुक्यातील वर्ष २०२४-२५ अंतर्गत प्रधानमंत्री जनजाती आदिवासी न्याय महा अभियान अंतर्गत आदिम जमातीतील सर्वेक्षण १३ हजार ०३२ कुटुंबांचे करण्यात आले असून १२ हजार २३७ पात्र घरकुल लाभार्थी संख्या तर घरकुल मंजूर लाभार्थी ६ हजार ४६२ संख्या आहे. कातकरी कुटुंबांना घरकुल देण्यासाठी जिल्हा परिषदेमार्फत मिशन मोडवर कामकाज करण्यात येत आहे.

प्रथमतः अंबरनाथ, भिंवडी, मुरबाड तालुक्यातील केवळ ३५ ग्रामपंचायतींचा प्रधानमंत्री जनजाती आदिवासी न्याय महा अभियान अंतर्गत समावेश करण्यात आला

## जिल्ह्यात कातकरी कुटुंबांचे सर्व्हेक्षण युध्द पातळीवर सुरु

होता. परंतू मुख्य कार्यकारी अधिकारी रोहन घुगे यांच्याकडील पाठपुराव्याने व जिल्ह्यातील आदिवासी संघटनांकडून वेळोवेळी केलेल्या मागणीनुसार यांच्या विशेष प्रयत्नांनी केंद्र शासनाकडील सर्वेक्षणाचे लिंक पुन्हा सुरू (Reopen) करुन देण्यात आली असून कातकरी कुटुंब या लाभापासून वंचित राहू नये, त्याअनुषंगाने सद्यस्थितीत ठाणे ग्रामीण भागामध्ये मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्या मार्गदर्शनाखाली सर्वेक्षणाचे कामकाज वेगाने सुरू आहे. आज अखेर १३ हजार ०३२ कुटुंबांचा सर्व्हे पुर्ण झाला असून १२ हजार २३७ लाभार्थी पात्र झाले असून ९ हजार ६८७ लाभार्थ्यांची नोंदणी (Registration) पुर्ण करण्यात आली आहे, तर ६ हजार ४६२ घरकुलांना मंजुरी देण्यात आलेली आहे. कोणतेही कुटुंब सर्वेक्षणापासून वंचित राहणार नाही याची विशेष दक्षता घेण्याबाबत



सर्व तालुकास्तरीय यंत्रणेला जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी सुचना दिले आहेत. जिल्ह्यातील सर्वच तालुक्यामध्ये सर्वेक्षण युध्द पातळीवर सुरू असून सर्वेक्षण अंतिम टप्प्यात आहे.

मुलभूत सुविधांसह पक्की घरे बांधण्यासाठी प्रती घरकुल २.३९ लाख (घरकुल अनुदान २.०० लाख, रु. १२ हजार रुपये/- SBM-G आणि मनरेगा अंतर्गत ९०/९५ दिवसांचे अकुशल वेतन रु.२७ हजार रुपये अंदाजे) अशी तरतूद केलेली असून आदिम जमातीतील पात्र लाभार्थ्यांना जास्तीत जास्त लाभ देण्यासाठी जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणेमार्फत विशेष प्रयत्न यावर्षी करण्यात आले आहे, अशी माहिती प्रकल्प संचालक छायादेवी शिसोदे यांनी दिली.

भारत सरकारकडून प्राप्त आदर्श कार्यपध्दतीनुसार ठाणे जिल्ह्यात एकुण PVTG अंतर्गत येणारी लोकसंख्या ५५ हजार ०७७ असून, PVTG HH(कुटुंब संख्या)- २५ हजार ३५७ आहेत. तसेच PVTG HHs (कच्चे घर असणारी कुटुंब संख्या)- ही ६ हजार ९०५ इतकी दर्शविण्यात आली होती परंतू आज अखेर उद्दिष्टापेक्षा जास्त १३ हजार ०३२ कुटुंबांचे सर्वेक्षण पुर्ण करण्यात आले आहे. विविध श्रमजीवी संघटना तसेच इतर संघटनांच्या मदतीने कामकाज करण्यासाठी सोईचे झाल्यामुळे या कामाची दखल विविध स्तरावर घेण्यात येत आहे.

प्रधानमंत्री जनजाती आदिवासी न्याय महा अभियान अंतर्गत अंबरनाथ तालुक्यातील सर्वेक्षण ९४१ कुटुंबांचे करण्यात आले असून पात्र घरकुल लाभार्थी संख्या ८६५ तर घरकुल मंजूर लाभार्थी ५५२, भिवंडी तालुक्यातील सर्वेक्षण ४ हजार १०१ कुटुंबांचे करण्यात आले असून पात्र घरकुल लाभार्थी संख्या ३ हजार ९२१ तर घरकुल मंजूर लाभार्थी १ हजार ८२९, मुरबाड तालुक्यातील सर्वेक्षण २ हजार ८९७ कुटुंबांचे करण्यात आले असून पात्र घरकुल लाभार्थी संख्या २ हजार ५२२ तर घरकुल मंजूर लाभार्थी १ हजार ३४४, शहापूर तालुक्यातील सर्वेक्षण ४ हजार ०७९ कुटुंबांचे करण्यात आले असून पात्र घरकुल लाभार्थी संख्या ४५२ तर घरकुल मंजूर लाभार्थी २ हजार ४०५, कल्याण तालुक्यातील सर्वेक्षण १ हजार ०१४ कुटुंबांचे करण्यात आले असून पात्र घरकुल लाभार्थी संख्या ८७७ तर घरकुल मंजूर लाभार्थी ३३२ आहेत. असे एकूण ठाणे जिल्ह्यात सर्वेक्षण १३ हजार ०३२ कुटुंबांचे करण्यात आले असून १२ हजार २३७ पात्र घरकुल लाभार्थी संख्या तर घरकुल मंजूर लाभार्थी ६ हजार ४६२ संख्या आहे.

कातकरी कुटुंबीयांना पक्के घरकुल मिळवुन देण्यासाठी जिल्हा परिषदेमार्फत विशेष प्रयत्न करण्यात येत असून विविध श्रमजीवी संघटना तसेच इतर सामाजिक संघटनाच्या पुढाकारामुळे प्रशासकीय कामकाज करण्यासाठी मोलाचे योगदान मिळाले आहे. जिल्ह्यातील पात्र घरकुल लाभार्थी १२ हजार २३७ यांना हक्काचे पक्के घर मिळणार असल्याने विविध स्तरावरून याची दक्षता घेण्यात येत आहे.

# एकनाथ शिंदेच्या दरबारात मिळणार झटपट न्याय !

**उपमुख्यमंत्री एकनाथ शिद जिथ उभे राहतात, तेथेच नागरिकांच्या समस्या सोडवतात, असा दावा शिंदेसेनेच्या पदाधिकाऱ्यांनी केला. आता शिंदेसेनेच्या शिलेदारांनी ठाणेकरांच्या समस्या तत्काळ सोडविण्याचा विडा उचलला आहे.**

******************************

**नाईकांच्या जनता दरबारात ३ ठाणेकरांना एक महिना थांबावे लागणार आहे. मात्र, आमच्याकडे येणाऱ्या ठाणेकरांच्या समस्यांचे तत्काळ निराकरण करण्याची हमी शिंदेसेनेच्या पदाधिकाऱ्यांनी दिली.**

******************************

**आता मंगळवारी दुपारी १२ ते २ ३ वाजेपर्यंत आनंद आश्रम येथे 'समस्या, सेवा, समाधान' या कार्यक्रमांतर्गत ठाणेकरांचे प्रश्न तत्काळ मार्गी लावले जाणार असल्याची हमी शिंदेसेनेने दिली. या कार्यक्रमाला शिंदेसेनेचे महापालिका हद्दीतील सर्व शहर प्रमुख, उपशहर प्रमुख उपस्थित राहणार आहेत. त्यामुळे नागरी समस्या मार्गी लागण्याची शक्यता आहे.**

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**ठाणे** : ठाण्यातील शिंदेसेना विरुद्ध भाजप हा सामना दिवसेंदिवस अधिक रंगतदार होत आहे. वनमंत्री गणेश नाईक यांनी जनता दरबार घेतल्यानंतर भाजपच्या आमदारांनी 'आमदार आपल्या भेटीला' हा उपक्रम सुरू केला. आता शिंदेसेनेच्या माध्यमातून देखील समस्या, सेवा, समाधान असे म्हणत जनतेचे प्रश्न तत्काळ मार्गी लावण्याची हमी दिली आहे. जनतेच्या समस्या सोडविण्यासाठी मंगळवारी आनंद आश्रम येथे माजी नगरसेवकांसह शहरप्रमुख व उपशहर प्रमुख यांच्या उपस्थितीत जनतेच्या समस्या मार्गी लावल्या जाणार असल्याचा दावा शिंदेंनी केला.

वनमंत्री गणेश नाईक यांच्या जनता दरबारात ठाण्यासह विविध भागातून ६५० हून अधिक नागरिकांनी समस्या मांडल्या. या समस्यांवर अधिकाऱ्यांनी कोणती उपाययोजना केली, याचे उत्तर महिन्यात घेतले जाणार आहे.

> **आठवड्यातून एकदा अशा पद्धतीने ठाणेकरांच्या समस्या जाणून घेतल्या जाणार आहेत. यात मी स्वत:, मनोज शिंदे आणि शहर प्रमुख, उपशहर प्रमुख उपस्थित असणार आहेत. यातून ठाणेकरांच्या समस्या सुटल्या तर त्याचे समाधान निश्चित आम्हाला असणार आहे.**
> **अशोक वैती,**
> **माजी महापौर, ठामपा**




# डोंबिवली - ठाणे बस सेवेमुळे रेल्वे अपघातावर नियंत्रण येणार

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**डोंबिवली** : मध्य रेल्वेतील सर्वात जास्त गर्दीचे रेल्वे स्थानक डोंबिवली आहे. वाढत्या गर्दीवर नियंत्रण मिळविण्यासाठी रेल्वे गाड्या वाढविण्यात आल्या असल्या तरी गर्दी कमी झाल्याचे दिसून येत नाही. यावर कल्याण ग्रामीण विधानसभा मतदारसंघाचे आमदार राजेश मोरे यांनी लक्ष देत पालिका आयुक्तांची भेट घेऊन डोंबिवली ते ठाणे बससेवा सुरू करण्याबाबत चर्चा केली. पालिका आयुक्तांनी सकारात्मक भूमिका घेत बससेवा सुरू करण्याचे आश्वासन दिले.

याबाबत आमदार मोरे पत्रकारांशी बोलताना म्हणाले, डोंबिवलीकरांना ठाणे शहरात जाण्याकरिता रेल्वेच्या गर्दीतून जाण्याची गरज भासणार नाही. डोंबिवली पश्चिमेकडील शास्त्रीनगर रुग्णालयजवळ ते ठाणे आणि दोन टाकी ते ठाणे शहर अशी परिवहन बससेवा सुरू होणार आहे. आपल्या मागणीचा विचार करून बससेवा सुरू करणार असल्याने पालिका आयुक्त डॉ. इंदू राणी जाखड यांचे आभार मानले. डोंबिवली ते ठाणे अशी बससेवा सुरू होणार असल्याने आता ठाणे शहरापर्यंतचा प्रवास सुखकर होणार आहे. तिकीट दराबाबत अद्याप निर्णय झालेला नाही.

सकाळच्या दरम्यान डोंबिवली रेल्वे स्थानकावर प्रवाशांची मोठ्या प्रमाणात गर्दी होत असते. डोंबिवली ते ठाणे रेल्वे स्थानकादरम्यान रेल्वे गाडीतून पडून अनेक अपघात झालेत. मात्र आता डोंबिवली ते ठाणे परिवहन बससेवा सुरू होणार असल्याने डोंबिवली, कोपर, दिवा, मुंब्रा, कळवा आणि ठाणे रेल्वे स्थानकादरम्यान प्रवाशांची संख्या काही प्रमाणात कमी होण्याची शक्यता आहे. या स्थानकादरम्यान रेल्वे अपघातांवर नियंत्रण येईल, असे डोंबिवलीकर म्हणत आहेत.

# ऐरोली-काटई मार्ग रखडणार? ठाणे पालिकेच्या तिजोरीत खडखडाट

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**ठाणे** : ऐरोली-काटई या महत्त्वपूर्ण मार्गात येणाऱ्या शीळ, डावले, डोमखार व देसाई या गावांतील भूसंपादनासाठी महापालिकेच्या तिजोरीत खडखडाट असल्याने हा प्रकल्प रखडण्याची चिन्हे आहेत. त्यामुळेच यातून मार्ग काढण्यासाठी पालिकेने राज्य शासनापुढे हात पसरले आहेत. महापालिकेने जमिनीच्या भूसंपादनासाठी शासनाकडे तब्बल ४०८ कोटी ७५ लाखांची मागणी सात महिन्यांपूर्वीच केली आहे. ऐरोली-काटई मार्ग हा नवी मुंबई आणि कल्याण-डोंबिवली शहरांना जोडणारा महत्त्वाचा मार्ग आहे. एमएसआरडीएच्या माध्यमातून या १२ कि.मी. मार्गाची उभारणी केली जात आहे. हा मार्ग ठाणे महापालिकेच्या हद्दीतील शीळ, डावले, डोमखार आणि देसाई गावांतून जाणार आहे. या जागेचे भूसंपादन करण्याची जबाबदारी ठाणे महापालिकेची आहे. या नियोजित ४५ ते ६५ मीटर मार्गापैकी ३० मीटर रस्त्याच्या भूसंपादनाचा प्रस्ताव महापालिकेने ठाणे जिल्हाधिकारी कार्यालयाकडे पाठवून कामासाठी निधी देण्याची मागणी राज्य शासनाकडे सात महिन्यांपूर्वी केली होती.

### खर्चात वाढ का ?

**एमएमआरडीएने ३० ऐवजी १ विकास आराखड्यात दाखविल्याप्रमाणे ४५ मीटर रुंद रस्त्याचे भूसंपादन करण्याबाबत पालिकेला कळविले होते. यामुळे पालिकेने नव्याने प्रस्ताव तयार केला. या प्रस्तावास पालिकेच्या २ प्रशासकीय महासभेने अलीकडेच मान्यता दिली. ठाणे महापालिकेने यापूर्वी तयार केलेल्या प्रस्तावानुसार ३० मीटर रुंद रस्त्याच्या भूसंपादनाकरिता २५४ कोटी रुपये इतका खर्च अपेक्षित होता. मात्र, नव्या प्रस्तावात ४५ मीटर रुंद रस्त्याचे भूसंपादन करण्यासाठी ४०८ कोटी ७५ लाख रुपये इतका खर्च अपेक्षित आहे.**

# अबू आजमींवर देशद्रोहाचा गुन्हा दाखल करा - उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता /

मुंबई : छत्रपती संभाजी महाराजांच्या मारेकऱ्याचे म्हणजे औरंगजेबाचे गोडवे गाणाऱ्या विधानसभा सदस्य अबू आजमी यांचा आम्ही निषेध करत असल्याचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी सांगितले. तसेच विधानसभा सदस्य अबू आजमींवर देशद्रोहाचा गुन्हा दाखल करण्याची मागणी विधानपरिषद व विधानसभा या दोन्ही सभागृहात उपमुख्यमंत्री श्री.शिंदे यांनी केली.

दोन्ही सभागृहात निवेदन करताना उपमुख्यमंत्री श्री. शिंदे म्हणाले, छत्रपती संभाजी महाराजांना आणि त्यांच्या शौर्याला मी मानाचा मुजरा करतो. विधानसभा सदस्य अबू आजमी यांच्यासारखी माणसं शरीराने भारतात राहतात. त्यांना देशाच्या इतिहासाशी, संस्कृतीशी कसलेही देणंघेणं नाही. औरंगजेब कसा शासक होता हे जगाला माहीत आहे. अशांची भलामण करणाऱ्यांचा आम्ही धिक्कार करतो. आपला इतिहास शौर्याचा आहे. पराक्रमाचा आहे. नऊ वर्षात 696 लढाया जिंकणारे शंभूराजे हे महापराक्रमी होते. ते उत्तम प्रशासक होते. औरंगजेबाचा खोटा इतिहास सांगण्यापेक्षा छत्रपती संभाजी महाराजांचा खरा इतिहास अबू आजमींनी शिकावा असे त्यांनी सांगितले.

## संक्षिप्त

### रिंगरोड ते आमणे गाव उडडाण पुल बांधा - शिवसेना

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

कल्याण : कल्याण पश्चिमेतील गंधारी ब्रिज ४५ मीटर रिंगरोड ते आमणे गाव समृध्दीला व बडोदा महामार्गाला जोडणारा उडडाण पुल तयार करण्याची मागणी शिवसेनेने केली आहे. याबाबत कल्याण पश्चिमचे शिवसेना शहर प्रमुख रवी पाटील यांनी राज्याचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना पत्र दिले आहे.

कल्याण, डोंबिवली, पनवेल, बदलापूर, अंबरनाथ, टिटवाळा, नवी मुंबई मार्गे गंधारी ब्रिज ४५ मीटर रिंगरोड कल्याण पश्चिम मार्गे पडघा मार्गे नाशिक, नगर व पुढे वाहतुक खूप मोठ्या प्रमाणात वाढली आहे. मुंबई नागपूर समृध्दी महामार्ग सुरु झाला आहे. तसेच बडोदा जे.एन.पी.टी मार्ग सुध्दा सुरु होत आहे. या अनुषंगाने भविष्यात मोठ्या प्रमाणात वाहतुक कोंडी होणार आहे. त्यामुळे तातडीने एम.एम.आर.डी.ए. च्या किंवा एम.एस.आर.डी.सी च्या माध्यमांतून समृध्दी महामार्गाला तसेच बडोदा महामार्गाला जोडणारा उडडाण पुल येताना व जाताना नागरिकांना सुविधा आमणे येथे उतरण्या व चढण्यासाठी तयार होणे आवश्यक आहे.

याचा पूर्ण विचार करून कल्याण येथे ४५ मीटर रिंग रोडला हा उड्डाण पुल जोडावा यामुळे वाहतुक कोंडीतून कल्याण, डोंबिवली, भिवंडी, पनवेल, नवी मुंबई व इतर शहराची वाहतूक कोंडी कमी होईल त्यामुळे अतिशय महत्त्वाचा व गेम चेंजर प्रकल्प तयार होईल असा विश्वास रवी पाटील यांनी व्यक्त केला आहे.

### शिवजयंती दिनी छत्रपती शिवाजी महाराजांच्या मंदिराचे लोकार्पण

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

कल्याण : महाराष्ट्राचे आराध्य दैवत छत्रपती शिवाजी महाराज यांचे मराडे पाडा येथील पहिले मंदिर पूर्णत्वास येत आहे. शिवक्रांती प्रतिष्ठानचे प्रमुख राजू चौधरी यांनी त्यांच्या सहकाऱ्यांसह तब्बल सात वर्षाच्या अथक प्रयत्नातून हे मंदिर साकारले आहे. या मंदिराचा लोकार्पण सोहळा चार दिवसांच्या धार्मिक विधी कार्यक्रमाने १७ मार्च रोजी तिथीनुसार साजऱ्या होणारे शिवजयंती दिनी होत आहे.

या वेळी देशभरात छत्रपती शिवाजी महाराजांची दैवत म्हणून भक्तिभावाने पूजा केली जाते. ३५० वर्षांनंतरही गडकिल्ले सोडले, तर त्यांचे अनेक पैलू समाजासमोर आलेले नाहीत. त्यामुळे शिवक्रांती प्रतिष्ठानने उभारलेले छत्रपती शिवाजी महाराजांचे मंदिर नक्कीच अनेकांसाठी प्रेरणास्थान आहे. शिवरायांच्या मंदिराचा कळशा रोहन, मूर्ती प्राणप्रतिष्ठा सोहळा आणि लोकार्पण सोहळा दिनांक 14 ते 17 मार्च या चार दिवसाच्या मध्ये पार पडणार आहे. यामध्ये भव्य दिव्य हरिपाठ, ऐतिहासिक कार्यक्रम, छत्रपती शिवाजी महाराजांची भव्य मिरवणूक, शिवसोहळा असे कार्यक्रम आयोजित केले असून 17 मार्च सकाळी भव्य दिव्य लोकार्पण सोहळा पार पडणार आहे.

या सोहळयास महाराष्ट्राचे मुख्यमंत्री, उप मुख्यमंत्री, मंत्री, साधू संत, महंत, कीर्तनकार, प्रवचनकार तसेच असंख्य शिवभक्तांची उपस्थिती असणार असल्याची माहिती शिवक्रांती प्रतिष्ठान संस्थापक अध्यक्ष डॉ. राजू चौधरी यांनी दिली.

# केडीएमसी प्रशासनाविरोधात काँग्रेसचे आंदोलन

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

कल्याण : कल्याण डोंबिवली महानगरपालिका क्षेत्रातील दुरावस्थेविरोधात आणि कार्यकाळ उलटूनही अद्याप स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका घेतल्या जात नसल्याबद्दल कल्याण जिल्हा काँग्रेसतर्फे आज केडीएमसी मुख्यालयासमोर धरणे आंदोलन करण्यात आले. काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष सचिन पोटे यांच्या नेतृत्वाखाली झालेल्या या आंदोलनात केडीएमसी प्रशासनातील भ्रष्ट अधिकाऱ्यांविरोधातही जोरदार घोषणाबाजी केली गेली. या धरणे आंदोलनामध्ये जिल्हाध्यक्ष सचिन पोटे यांच्यासह वरिष्ठ नेते राजाभाऊ पातकर, महिला जिल्हाध्यक्ष कांचन कुलकर्णी, ब्लॉक अध्यक्ष विमल ठक्कर, माजी नगरसेवक नविन सिंग, यांच्यासह काँग्रेसचे अनेक पदाधिकारी आणि



कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

2015 नंतर कल्याण डोंबिवली महानगरपालिकेची सार्वत्रिक निवडणूक झालेली नाही. तत्कालीन निवडणुकीत निवडल्या गेलेल्या लोकप्रतिनिधींचा कार्यकाळ संपूनही आता 5 वर्षे उलटली आहेत. परिणामी कल्याण डोंबिवलीमध्ये नागरी समस्यांनी अक्राळ विक्राळ रूप धारण केले असल्याचे जिल्हाध्यक्ष सचिन पोटे यांनी सांगितले. तसेच शहरांमध्ये अस्वच्छता, अनारोग्य, शिक्षण आणि वाहतूक कोंडी, अनधिकृत बांधकामांचा मोठा डोंगर उभा राहिला आहे. शहराच्या या सर्व समस्या दिवसागणिक गंभीर होत चालल्या असताना केडीएमसी प्रशासन मात्र ढीम्मपणे एसी केबिनमध्ये बसून असल्याचा गंभीर आरोपही यावेळी काँग्रेस पक्षाकडून करण्यात आला आहे.

तर 65 अनधिकृत इमारतींवरील कारवाईमध्ये त्यातील सामान्य नागरिक विनाकारण भरडले जात असून प्रशासनातील भ्रष्ट अधिकाऱ्यांमुळे या शेकडो लोकांचे संसार आज रस्त्यावर आल्याचेही जिल्हाध्यक्ष सचिन पोटे यांनी प्रसिद्धी माध्यमांशी बोलताना सांगितले. या सर्व गोष्टींचा विचार करता केडीएमसी आयुक्त डॉ. इंदू राणी जाखड यांनी प्रशासनातील एकाही भ्रष्ट अधिकाऱ्यांना अजिबात पाठीशी न घालता त्यांना घरचा रस्ता दाखवण्याची मागणीही यावेळी काँग्रेसतर्फे करण्यात आली. दरम्यान कल्याण शहर जिल्हा काँग्रेसच्या एका शिष्टमंडळाने केडीएमसी अधिकाऱ्यांची भेट घेऊन आपल्या मागण्यांचे निवेदन सादर केले.

# प्रणव शेलारचे युध्दनितीचे धडे

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

उल्हासनगर : सध्या बौलिवुड मधिल ऐतिहासिक चित्रपट म्हणून गौरविला गेलेला छावा याचं लोकप्रियतेचे एक महत्वाचं कारण म्हणजे यात दाखवलेली शिवकालीन युद्धनीती. पण, यात विकी कौशल, रश्मिका मंदानापासून सगळ्या कलावंताना साहसी युद्धाचे धडे कल्याण - उल्हासनगरच्या सिमेवरील राहणाऱ्या सुप्रसिद्ध युद्धकला प्रशिक्षक प्रणय शेलार (भार्गव) यांनी दिले. हे जाणून प्रत्येक मराठींचा अभिमान दुणावेल.

प्रणय कडून या चित्रपटातील कलाकारांनी तलवारबाजी, लाठी काठी, दांडपट्टा घोडेस्वारी, भालाफेक व इतर पारंपरिक युद्ध तंत्राचे प्रशिक्षण घेतले. या कठोर प्रशिक्षणामुळे चित्रपटातील युद्धदृश्ये अधिक वास्तवदर्शी झाले आहेत. मानेरेगाव मधील शिवगर्जना प्रतिष्ठानचे प्रमुख प्रणय शेलार (भार्गव) यांच्या मार्गदर्शनाखाली आठ महिन्यांच्या कठोर प्रशिक्षणानंतर कलाकारांनी युद्धकलेतील बारकावे आत्मसात केलेत. 'छावा' चित्रपटाचे दिग्दर्शक लक्ष्मण उतेकर यांचा पहिल्या दिवसापासूनच एक स्पष्ट दृष्टिकोन होता तो म्हणजे "मराठ्यांचे युद्धकौशल्य मोठ्या पडद्यावर वास्तवदर्शी भासले पाहिजे!" त्यासाठी त्यांनी कल्याणचे सुप्रसिद्ध युद्धकला प्रशिक्षक प्रणय (भार्गव) शेलार यांना जबाबदारी दिली, ज्यांनी कलाकारांना ८ महिने कठोर युद्धकला प्रशिक्षण दिले.

याशिवाय विकी कौशल (छत्रपती संभाजी महाराज) – दोन हातात तलवार आणि दांडपट्टा हाताळण्याचे पारंपरिक प्रशिक्षण, रश्मिका मंदन्ना (महाराणी येसूबाई भोसले) यांना तलवारबाजी, आशुतोष



राणा (हंबीरराव मोहिते) – यांना मराठा लढाईतील विशेष युद्धनिती तसेच विनीत कुमार सिंग, संतोष जुवेकर, प्रदीप रावत, आशिष पथोडे, शुभंकर एकबोटे, अंकित शर्मा, बालाजी मनोहर, सर्व बालकलाकार, सर्व प्रमुख मुघल सरदार यांना शस्त्र विद्येचे धडे प्रणयनेच दिले आहेत

यासाठी प्रणय दररोज ६ ते ८ तास सराव करून घेत होते. काही कलाकारांना प्रथमच घोडेस्वारी किंवा शस्त्र हाताळण्याचा अनुभव मिळत होता. त्यामुळे सुरुवातीला त्यांना मोठे आव्हान वाटले, मात्र प्रणय शेलार यांच्या शिस्तबद्ध मार्गदर्शनामुळे ते एका खऱ्या योद्ध्याप्रमाणे तयार झाले. केवळ प्रशिक्षक म्हणूनच नव्हे, तर 'छावा' चित्रपटात प्रत्यक्ष भूमिकाही प्रणय शेलार यांनी साकारली आहे. "चित्रपटाच्या सुरुवातीला बुऱ्हाणपूरच्या लढाईतील युद्धदृश्यमध्ये छत्रपती संभाजी महाराजांनी मला वाचवण्यासाठी घेतलेली उडी, मी बाण मारून आग लावण्याचा सीन तसेच संगमेश्वरच्या जंगलातील युद्धदृश्ये अप्रतिम चित्रित करण्यात आली आहेत," असे शेलार यांनी सांगितले. शिवगर्जना प्रतिष्ठान या संस्थेच्या माध्यमातून प्रणय शेलार गेली १३ वर्षे मराठ्यांच्या परंपरागत युद्धतंत्राचे प्रसार व प्रशिक्षण देत आहेत."

## सफाळे रेल्वे स्टेशन परिसरातील

# प्रतिबंधक पार्किंग गाडयांवर कारवाई

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

सफाळे : जित्याची खोड मेल्या शिवाय जात नाही, त्या प्रमाणे सफाळे रेल्वे स्टेशन परिसरातील प्रतिबंधक शेत्रात नो पार्किंग चे फलक लावण्यात आले आहे. तरीही अनेक रथी महारथी आपल्या मोटारसायकली दैनंदिन प्रवास करणाऱ्या प्रवासी यांना, रेल्वे प्लाटफॉम पर्यंत जाण्यायेण्यासाठी साठी ठेवण्यात आलेल्या,मोकळया जागेवर. आपल्या गाड्या



पार्किंग करून निघून जात आहे.

यांच्या वर रेल्वे सुरक्षा बल पोलीस सफाळे आणि सफाळे पोलीस ठाणे कार्यरत ट्राफिक पोलीस, अधीकारी, कर्मचारी दंडात्मक करीत आहेत. परंतु अशा बेशिस्त गाड्या पार्किंग करून निघून जाणऱ्यावर ठोस कारवाई होत नाही तो पर्यंत असाच त्रास प्रवासी यांना होत राहील असे सफाळे पुर्व आणि पश्चिम भागातील दैनंदिन रेल्वेने प्रवास करणारे यांचे, रेल्वे सुरक्षा बल ( RPF ) अधिकारी पालघर आणि ट्राफिक पोलीस सफाळे - पालघर अधिकारी यांना सांगणे आहे. तरी सक्षम अधिकारी यांनी ती कारवाई लवकरात लवकर करावी. असे प्रवासी वर्गला अभिप्रेत आहे.

दिनांक 3.एप्रिल 2025 रोजी रेलवे सुरक्षा बल पालघर, सफाळे रेल्वे स्टेशन, हेड /कांस्टेबल ओमप्रकाश तिवारी आणि सफाळे पोलीस ठाणे अंतर्गत ट्रैफिक पुलिस बाळासाहेब यमागार - ASI यांनी संयुक्तपणे, सफाळे पूर्व रेल्वे तिकीट खिडकी परिसरात प्रतिबंधक असलेल्या शेत्रात मोटरसायकली आढळून आल्या. त्यामुळे त्यांच्यावर ई चलनाद्वारे दंडात्मक कारवाई केली आहे. असे रेल्वे सुरक्षा बल यांच्या कडून अधिकृतपणे सांगण्यात आले आहे.

# पाण्याअभावी डायलिसिस सेंटर सलाईनवर

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

मुरबाड : मुरबाड ग्रामीण रूग्णालयात नोव्हेंबर 2024 पासून अत्याधुनिक तंत्रज्ञान युक्त असे 5 बेडचे डायलीसीस सेंटर सुरू करण्यात आले.जिल्हा शल्यचिकित्सक डॉ. कैलास पवार यांच्या मार्गदर्शनाखाली हे सेंटर सुरू करण्यात आले होते मात्र आता या सेंटर मध्ये पुरेसा पाणी साठा उपलब्ध होत नसल्याने काही रुग्णांना डायलेसिस न करताच परत जावे लागत आहे.त्यामुळे हे अत्याधुनिक सेंटर आता समस्येच्या गर्तेत सापडले आहे. याबाबत डायलेसिस सेंटरचे प्रमुख यांनी रूग्णालय प्रशासनाकडून पुरेसा पाणी साठा उपलब्ध होत नसल्याने रुग्णांना परत जावे लागत आहे तर ग्रामीण रूग्णालयाचे अधीक्षक डॉ संग्राम डांगे यांना याबाबत विचारले असता आपण या सेंटर साठी जागा उपलब्ध करून दिली नगरपंचायत कडून मिळणारे पाणी ही उपलब्ध करून दिले मात्र त्यांना जेवढे पाणी लागते त्याची उपाययोजना करणे हे त्यांचे काम देखील असून आपणं त्यांना बोअरवेल किंवा योग्य पर्याय करून पुरेसा पाणी साठा




> नगरपंचायत कडे वाढिव पाण्यासाठी लेखी मागणी केली आहे.आमच्याकडे साठा करण्यासाठी टाक्या आहेत नगरपंचायतने वाढिव पाणी दिले तर प्रश्न मिटेल.
> – संग्राम डांगे, वैंद्यकीय अधिकारी ग्रामीण रुग्णालय मुरबाड

मिळवावा असे लेखी पत्र दिलें असून त्यांनी त्यावर कुठलाच पर्याय शोधला नसुन त्यांनी जबाबदारीने सेवा द्यावी असे सुचविले आहे. त्यामुळें रुग्णालयात सुरू झालेले हे सेंटर अडचणीत सापडले आहे.

मुरबाड ग्रामीण रूग्ण्यालयात सुरू करण्यात आलेले या अत्याधुनिक डायलिसिस सेंटर सुरू झाल्यानें रुग्णाची धावपळ थांबली होती एकावेळी 5 रुग्णांना उपचार घेणे सहज शक्य झाल्यानें रुग्ण संख्या हि वाढली होती. यामुळे मुरबाड शहर व तालुक्यातील डायलिसिस रुग्णांना खूप मोठा दिलासा मिळाला होता पण आता पाणी समस्ये मुळे रुग्ण परत जात असून त्यांची धावपळ वाढली आहे त्यामूळे पाणी समस्या सोडविण्याची मागणी होत आहे.

# टिटवाळ्यातील सावरकर नगरमध्ये विकासकामांचे भूमीपूजन

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

शहापूर : कल्याण पश्चिम विधानसभा मतदारसंघात मोठ्या संख्येने विकासकामे सुरू असून टिटवाळा परिसराचाही सर्वांगीण विकास करण्याच्या ध्यासाने आपण कार्य करीत असल्याचा विश्वास भाजपचे माजी आमदार नरेंद्र पवार यांनी व्यक्त केला. नरेंद्र पवार यांच्या प्रयत्नातून आणि माजी उपमहापौर उपेक्षा शक्तिवान भोईर यांच्या पाठ पुराव्यातून सावरकर नगर परिसरात विविध विकासकामे करण्यात येत असून त्यांच्या भूमीपूजन प्रसंगी ते बोलत होते.

नरेंद्र पवार यांच्या विशेष प्रयत्नाने महाराष्ट्राचे माजी राज्यसभा खासदार व्हि. मुरलीधरन यांच्या खासदार निधीतून काही दिवसांपूर्वीच गाळेगाव परिसरात विकासकामांचे भूमीपूजन संपन्न झाले. त्यापाठोपाठ आज प्रभाग क्रमांक 9 सावरकर नगर परिसरातही विविध विकासकामे केली जाणार असून विविध मान्यवरांच्या उपस्थितीत त्याचा भूमीपूजन सोहळा संपन्न झाला. यासाठी कल्याण डोंबिवलीच्या माजी उपमहापौर उपेक्षा शक्तिवान भोईर यांनी पाठ पुरावा केला आहे.येत्या काळात कल्याण विधानसभा मतदारसंघात आणि मतदारसंघ परिसरात आजच्या घडीला अनेक महत्त्वाकांक्षी पायाभूत प्रकल्पांची कामे वेगाने सुरू आहेत. त्यामध्ये मोहने आणि टिटवाळा परिसरही विकास कामांपासून अजिबात वंचित राहू देणार नाही. या भागाच्या सर्वांगीण विकासासाठी आपण सदैव प्रयत्नशील असून या भागाला मुख्य प्रवाहामध्ये आणणे हेच आपले प्रमूख ध्येय असल्याचे नरेंद्र पवार यांनी यावेळी उपस्थितांशी संवाद साधताना नमूद केले.दरम्यान यावेळी ह.भ.प. चंद्रभान सांगळे महाराज, कल्याण डोंबिवलीच्या माजी उपमहापौर उपेक्षा शक्तिवान भोईर, माजी आमदार नरेंद्र पवार यांच्यासह प्रमुख मान्यवरांच्या उपस्थितीत सावरकर नगर येथील अंतर्गत रस्ते आणि झाकणासह गटार बांधकाम या विकासकामांचे आज भूमिपूजन करण्यात झाले.

यावेळी ह.भ.प.चंद्रभान सांगळे महाराज, कल्याण डोंबिवलीच्या माजी उपमहापौर उपेक्षा भोईर, भाजपा मोहने टिटवाळा मंडल अध्यक्ष शक्तीवान भोईर, प्रदेश सहसंयोजक उद्योग आघाडी परेश गुजरे, जेष्ठ कार्यकर्ते नारायण मिरकुटे, मंडल महिला मोर्चा अध्यक्ष सारिकाताई नवनाथ पाटील, सरचिटणीस संतोष शिंगोळे, अनंता पाटील, अमोल केदार वार्ड क्र.९ मांडा पूर्व अध्यक्ष दिपक कांबळे, वार्ड क्र.८ मांडा पश्चिम अध्यक्ष रुपेश भोईर, युवामोर्चा जिल्हा उपाध्यक्ष शैलेश देशपांडे, भूषण बापट, चेतन कान्हेरे, ब्रिजेश पांडे, संजय आधंगळे, स्वप्निल पाठारे, महेश घोलप, शैलेश गिरी,विनोद इंगळे, हेमंत गायकवाड तसेच परिसरातील ज्येष्ठ नागरिक, माता-भगिनी, युवा बांधव, भाजप पदाधिकारी-कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# समाज विकास विभागातर्फे दिव्यांगाच्या सांस्कृतिक कार्यक्रमांचे सादरीकरण

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

कल्याण : ज्या व्यक्तींना परमेश्वराने काहीतरी कमी दिले असतं, अशा व्यक्तींना 6वे इंद्रिय भरभरुन दिलेला असतो. म्हणजेच परमेश्वराचा प्रेरणा अंश अशा व्यक्तींमध्ये असते, ह्या व्यक्ती म्हणजे दिव्यांग व्यक्ती होय, असे प्रतिपादन प्र.के.आचार्य अत्रे रंगमंदिरात दिव्यांग व्यक्तींच्या सांस्कृतिक सादरीकरणाचे वेळी कल्याण डोंबिवली महापालिकेचे अतिरिक्त आयुक्त योगेश गोडसे यांनी केले. या कार्यक्रमास महापालिकेच्या समाज विकास विभागाचे उपआयुक्त संजय जाधव, अपंग विकास महासंघाचे अध्यक्ष अशोक भोईर, समाज विकास अधिकारी प्रशांत गवाणकर व इतर मान्यवर उपस्थित होते.




महापालिका आयुक्त डॉ.इंदु राणी जाखड यांच्या संकल्पनेतून दिव्यांग व्यक्तींना मुख्य प्रवाहात आणण्यासाठी त्यांच्या अडचणी समजावून घेऊन, त्यांना विविध सोयीसुविधा महापालिकेमार्फत दिल्या जात आहेत. या अनुषंगाने दिव्यांग व्यक्तींसाठी क्रीडा स्पर्धांचे व सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन महापालिकेच्या प्र.के.अत्रे रंगमंदिरात समाज विकास विभागामार्फत करण्यात आले होते. यावेळी दिव्यांग व्यक्तींनी गीत-गायन, तबला

> परमेश्वरांचा प्रेरणा अंश असलेल्या व्यक्ती, म्हणजेच दिव्यांग
> – केडीएमसी अतिरिक्त आयुक्त योगेश गोडसे

वादन व इतर कला कौशल्याचे माध्यमातून एका पेक्षा एक अप्रतिम कार्यक्रमांचे सादरीकरण करुन उपस्थितांना मंत्रमुग्ध केले. या कार्यक्रमास सुमारे 500 दिव्यांगांनी आपली उपस्थिती दर्शविली होती. यावेळी घेण्यात आलेल्या स्पर्धांमध्ये विजेत्या दिव्यांग महिलांना आई तुळजा भवानी या मालिकेतील प्रसिद्ध अभिनेत्री पुजा काळे यांच्या हस्ते पैठणी आणि दिव्यांग पुरुष विजेत्यांना कुर्ता-पजामा बक्षिस स्वरुपात देण्यात आले. तसेच उपस्थित सर्व दिव्यांगांना प्रोत्साहनपर घड्याळ भेट वस्तू स्वरूपात प्रदान करण्यात आले.

समाज विकास विभागाचे उपआयुक्त संजय जाधव यांनी, महापालिकेतर्फे प्रथमच आयोजिलेल्या या कार्यक्रमात "अत्यंत तन्मयतेने जबाबदारी नव्हे, तर सेवा म्हणून केलेले दिव्यांग व्यक्तींच्या कार्यक्रमाचे सादरीकरण" अशा शब्दात महापालिका अतिरिक्त आयुक्त योगेश गोडसे यांनी समाज विकास विभागाचे उपआयुक्त संजय जाधव यांची प्रशंसा केली. तर "दिव्यांगासाठी सर्वाधिक योजना राबविणारी महापालिका" अशा शब्दात अपंग विकास महासंघाचे अध्यक्ष अशोक भोईर यांनी महापालिकेचे कौतुक केले.

जीवनदीप शैक्षणिक संस्था पोई, संचलित
जीवनदीप कॉलेज, गोवेली
मुंबई विद्यापीठाशी कायम संलग्न, नॅक मुल्यांकन (B-Grade) प्राप्त
ADMISSION OPEN 2024-25
११ वी व १२ वी
ARTS, COMMERCE, SCIENCE (IT / CS)
UNDER GRADUATE: B.Sc. Data Science, B.Sc. I.T., B.Sc. CHEMISTRY MATHS, B.M.S., B.A.F., BAMMC, B.Com., B.A.
POST GRADUATE: M.Sc. IT, M.Sc. CHEMISTRY, M.Com. ADVANCED ACCOUNTANCY, M.A. MARATHI, M.A. HISTORY, M.A. ECONOMICS, M.A. SOCIOLOGY, M.A. GEOGRAPHY, M.A. C&J
Look forward to a BRIGHTER FUTURE
8108559566
9619188558

'ठाणे जीवनदीप वार्ता' हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक तथा संपादक श्री.रविंद्र नारायण घोडविंदे यांनी; महाराष्ट्र प्रिंटिंग प्रेस, हाऊस नंबर ८६२, उलनचाळ, अंबरनाथ (पश्चिम), जिल्हा - ठाणे, महाराष्ट्र - ४२१५०५ येथे छापून, एम/ए-१०६, एम टाईप बिल्डिंग, कृषी उत्पन्न बाजार समिती आवार, फोर्टीस हॉस्पिटल समोर, बैलबाजार, कल्याण (प.) जि.ठाणे ४२१३०१ येथून प्रसिद्ध केले.
(या अंकात प्रसिद्ध होणाऱ्या बातम्या, लेख, जाहिराती इत्यादींशी संपादक सहमत असतीलच असे नाही) (सर्व कायदेशीर न्यायनिवाडा मा.कल्याण सत्र न्यायालयात) कायदेविषयक सल्लागार - ॲड. जयकुमार ए. रिजवानी)
मुख्य कार्यालय - एम/ए-१०६, एम टाईप बिल्डिंग, कृषी उत्पन्न बाजार समिती आवार, फोर्टीस हॉस्पिटल समोर, बैलबाजार, कल्याण (प.) जि.ठाणे ४२१३०१
संपर्क क्रमांक : ९६१९१८८५५८, ९०८२६६४७८१ E Mail - jeevandeepvartanews2020@gmail.com / news.thanejeevandeep@gmail.com
RNI NO : MAHMAR/2016/72091 ■ Postal Registration No. THC/256/2022-2024